# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र.११६** **दिनांक ११/०४/२०२३**

## बोगस कॉल सेंटर चालवणाऱ्या आरोपीतांवर अर्नाळा पोलीस ठाण्याची कारवाई.

दिनांक ०९/०४/२०२३ रोजी अर्नाळा पोलीस ठाणेस गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, अर्नाळा पोलीस ठाण्याचे हद्दीत ओएसी पेंट बॉल अरेना, फार्म हाऊस राजोडी बिच रिसॉर्ट जवळ विरार पश्चिम येथे बेकायदेशीररित्या विना परवाना कॉल सेंटर चालवीले जात असुन सदर कॉल सेंटर मध्ये ऑस्ट्रेलियन व इतर देशातील Paypal वापर करणाऱ्या नागरिकांचा विश्वास संपादन करुन त्यांची गोपनीय माहिती प्राप्त करीत असुन त्याद्वारे फसवणुक करीत आहेत. सदर बातमीबाबत पोलीस ठाण्याचे व.पो.नि. श्री. कल्याणराव कर्पे व पो.नि.श्री. अमरसिंह पाटील (गुन्हे) यांनी खात्री करुन सदरची माहिती वरिष्ठांना दिली होती. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे वपोनि/कर्पे यांनी कारवाई करणे करीता पोनि/अमरसिंह पाटील व पोलीस ठाण्यातील पथक तयार केले होते.

दिनांक ०९/०४/२०२३ रोजी पहाटे ०४:०० वाजता ओएसी पेंट बॉल अरेना, फार्म हाऊस राजोडी बिच रिसॉर्ट जवळ विरार पश्चिम येथे सदर पथकाने कारवाई केली. सदर कारवाईत कॉल सेंन्टर मध्ये ३७ पुरुष व १० महिला हे बेकायदेशीरपणे काम करीत असताना मिळुन आले. त्यांचेकडे चौकशी केली असता सदर इसम हे विना परवाना बोकायदेशीर रित्या कॉल सेंटर चालवुन सदर कॉल सेंटर मधुन इंनबाऊन्ड कॉल वरुन PayPal Australia Pty Limited या ऑस्ट्रेलियास्थित बँकींगचे ग्राहकांचे येणारे कॉल स्विकारुन त्यांना PayPal चे कॉलसेंटर असल्याचे भासवून बोगस कॉल सेंटर सुरु करुन परदेशातील-ऑस्ट्रेलियन व इतर देशाचे PayPal ग्राहकांची गोपनीय माहिती चोरी करुन त्यांचे साथीदारांना पुरवित असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर घटनास्थळावरुन एकुण १६,१९,०००/- रुपये किंमतीचे संगणक व इतर साहित्य जप्त करण्यात आलेले आहे. आरोपी विरुध्द सपोनि/ अर्जुन पवार यांनी तक्रार दिल्यांने अर्नाळा पोलीस ठाण्यात I १३७/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४१९,४२०,१२०(ब), ३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ४३, ६६, ६६ (क), ६६(ड), ७५ व भारतीय टेलिग्राम कायदा कलम २५ अन्वये दिनांक ०९/०४/२०२३ रोजी २०:१२ वाजता गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात एकुण ४९ आरोपी अटक करण्यात आलेले आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, विरार, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली अर्नाळा पोलीस ठाण्याचे व.पो.नि. श्री. कल्याणराव कर्पे, पो.नि. अमरसिंह पाटील (गुन्हे), स.पो.नि.परदेशी, अर्जुन पवार, मुसळे, पो.उप.नि. राव, मोहिते, स.फौ. मते, पो.हवा. डामरे, विलास पवार, राजेंद्र पवार, जाधव, मोराळे, पो.अंम. मंझा, राहुल कदम, आळंगे व म.पो.अंम.शिळकंदे यांनी केली आहे.



----ooo----